# प्रेसनोट

दि. १४/१०/२०२४

**अ‍ॅन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील गुन्हे शाखेचे सहायक पोलीस उपनिरीक्षक याचेवर लाच मागणी प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | खडकी पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. २८०/२०२४. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अ अन्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ४३ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | संतोष सुर्यकांत क्षिरसागर, सहायक पोलीस उपनिरीक्षक, गुन्हे शाखा, युनिट -३, पुणे शहर. (वर्ग-३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,००,०००/- (पाच लाख रुपये) |
| पडताळणीअंती लाच मागणी रक्कम | २,००,०००/- (दोन लाख रुपये) |
| पडताळणी दिनांक | दि. २१/०५/२०२४ रोजी |
| ठिकाण | रेंज हिल,खडकी, पुणे येथील गुन्हे शाखा, युनिट ३, पुणे शहर यांचे कार्यालयात. |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचा मित्र तानाजी शेलार यांचे विरोधात दाखल असलेल्या फसवणुकीचे गुन्ह्यात तक्रारदार यांना सहआरोपी करुन अटक न करण्यासाठी पोलीस निरीक्षक बहिरट यांच्या सांगण्यावरून, त्यांच्या करीता लोकसेवक संतोष क्षिरसागर यांनी तक्रारदार यांचेकडे ५ लाख रुपयाची लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, लोकसेवक संतोष क्षिरसागर यांनी तक्रारदार यांचेकडे वरील कामासाठी ५,००,०००/- रुपयांची लाच मागणी करुन, पंचासमक्ष तडजोडीअंती २,००,०००/- (दोन लाख रुपये) लाच रक्कम मागणी केल्याचे निष्पन्न झाले. लोकसेवक संतोष क्षिरसागर यांचेवर खडकी पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे वरील प्रमाणे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक श्रीहरी बहिरट, गुन्हे शाखा, पुणे शहर यांच्या या गुन्ह्यातील सहभागाबाबत अधिक तपास सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस उपअधीक्षक अनिल कटके तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-अ‍ॅप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
५) ऑनलाईन अ‍ॅप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

14/10/24

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.